इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

पहा: १) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१. दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८३ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

G/GR-PS-E.lwp

Scanned with OKEN Scanner

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२०१९३२४४००1 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७६ | एलोरा मेडीकल व एज्युकेशनल फाउंडेशन, भारती विद्यापीठामागे कात्रज, पुणे | आर्यन्स स्कुल, आर्यन्स व्हॅली, भिलारवाडी, ता.हवेली, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७७ | जय गणेश एज्युकेशन फाउंडेशन, वडगाव, बु.पुणे-४ | जयगणेश प्राथ. विद्या, आंबेगाव, ता.हवेली जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७८ | अभिनव एज्यु. सोसा. २०/२/१, गणराज हाईटस, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे४३ | अभिनव इंग्लिश स्कूल, न-हे, ता.हवेली. जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७९ | डी.एस.कुलकर्णी एज्युकेशन ट्रस्ट, डी.एस.के.हाऊस, जंगली महाराज रोड पुणे | डी.एस.के. स्कूल, फुरसुंगी, ता.हवेली, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ८० | सरस्वती विद्या प्रसारक मंडळ, स्वरविलास, प्रभात रोड, एरंडवणे पुणे | खडकवासला इंग्लिश मिडीअम स्कूल, आगलांबे, ता.हवेली,पुणे | इंग्रजी | १ ली |
| ८१ | जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, सराटी, ता.इंदापूर, जि.पुणे | जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूल, सराटी, ता.इंदापूर | इंग्रजी | १ ली |
| ८२ | श्री श्री रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, महाराष्ट्र दामोदर भवन,७/ए ढोले पाटील रस्ता, पुणे-१ | श्री श्री रविशकर विद्यामंदिर,यशोमंगल सोसा. समोर,पिंपरी-चिंचवड लिंक रोड, चिंचवड-३३ | इंग्रजी | १ ली |
| ८३ | ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ ज्योती नगर काळेवाडी पुणे १७ | पार्वती इंग्लिश मिडी स्कुल | इंग्रजी | १ ली |
| ८४ | सेंट एल्यास एज्यु ट्रस्ट संतोषनगर, थेरगाव पुणे | सेंट एल्यास स्कुल , पवारनगर थेरगाव | इंग्रजी | १ ली |
| | जिल्हा - अहमदनगर | | | |
| १ | भैरवनाथ आदिवासी ग्रामीण विकास सेवा संस्था, खिरविरे, ता. अकोले | न्यु इंग्लिश मेडीयम स्कुल, शेंडी (भंडारदरा), ता. अकोले | इंग्रजी | १ ली |
| २ | अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले, ता. अकोले | इंग्लिश मेडीयम स्कुल, शेंडी (भंडारदरा), ता. अकोले | इंग्रजी | १ ली |
| ३ | शारदा शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, ता. संगमनेर | प्रवरा विद्यालय, खंडोबा गल्ली, संगमनेर, ता. संगमनेर | इंग्रजी | १ ली |
| ४ | संगम सेवाभावी ट्रस्ट, संगमनेर, ता. संगमनेर | कै. गेणुजी डेरे पाटील इंग्लिश मेडीयम स्कुल, क-हे, ता. संगमनेर | इंग्रजी | १ ली |
| ५ | संगमनेर मेडिकल फाऊंडेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, संगमनेर, ता. संगमनेर | एकलव्य ॲकेडमी, कर्जुले पठार, ता. संगमनेर | इंग्रजी | १ ली |
| ६ | ओमसाई युवा विकास प्रतिष्ठाण, शिंगणापुर, ता. कोपरगांव | सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साहेब इंग्लिश मेडीयम स्कुल, शिंगणापुर, ता. कोपरगांव | इंग्रजी | १ ली |
| ७ | ओमसाई ग्रामीण शिक्षण संस्था, कोपरगांव, ता. कोपरगांव | साईशक्ती इंग्लिश मेडीयम स्कुल, कासली, ता. कोपरगांव | इंग्रजी | १ ली |
| ८ | श्री सद्‌गुरु ग्रामीण विकास मंडळ, साकुरी, ता. राहाता | विद्यावर्धिनी इंग्लिश मेडीयम स्कुल, साकुरी, ता, राहाता | इंग्रजी | १ ली |
| ९ | आदिवासी ग्रामीण विकास संस्था, राहुरी, ता. राहुरी | ज्ञानदिप इंग्लिश मेडीयम स्कुल, बोराफाटा (वांजुळपोई), ता. राहुरी | इंग्रजी | १ ली |
| १० | स्फुर्ती महिला आधार केंद्र, सातभाईमळा, ता.जि.अ.नगर | विद्या विहार इंग्रजी प्राथमिक शाळा, पांढरीपुर, ता. नेवासा | इंग्रजी | १ ली |

Scanned with OKEN Scanner

श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर मोशी, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेला इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७, या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१९/प्र.क्र.२४/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३,

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१८/वर्गवाढ/ड ५१२/४९६१, दिनांक ३०/११/२०१८,

शासन निर्णय:-

श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर मोशी, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेला खालील विवरणात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नांव | माध्यम | मंजूर केलेला वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर मोशी, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |

२. वरील शाळेला सन २०१६-१७ या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.र.परमार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,

Scanned with OKEN Scanner

नाव

व उपसंचाल

(२१)

(१)

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- प्राशास्थ ३२१५/प्र.क्र.११६/एसएम-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- २४ एप्रिल, २०१५

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,
पुणे

विषय:-प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत
श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या शाळेचे चिंचवड पुणे या कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या वडुसविले टाऊनशिप बोऱ्हाडेवाडी, मोर्शी येथे केलेल्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत

संदर्भ : आपले क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१४-१५/५४३०/३२,
दि. १७ मार्च, २०१५ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेचे,वडुसविले टाऊनशिप बोऱ्हाडेवाडी, मोर्शी येथे शासन मान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात आले आहे. सदर संस्था विशेष मुलांच्या व गरीब शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे, तसेच स्थलांतरांसाठी पालकांनी केलेली विनंती विचारात घेऊन या शाळेच्या स्थलांतरास खालील अटींच्या अधीन राहून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे :-

१) स्थलांतरीत प्राथमिक शाळेची कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२) स्थलांतरास सर्व शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

३) शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.

४) स्थलांतरीत ठिकाणी आरटीई ॲक्ट, २००९ नुसार प्राथमिक शाळेसाठी आवश्यक जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

याबाबत संस्थेच्या लेटरहेडवर शपथपत्र घेण्यात यावे. तसेच याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खात्री करून घेणे आवश्यक राहील.

५) श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रिय अधिकाऱ्यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे व तसे हमीपत्र संस्थेकडून रू.१००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करून घ्यावे.

६) स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तींमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

७) प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी शिक्षक अतिरिक्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

८) स्थलांतरीत प्राथमिक शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी देण्यात यावी.

९) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजूरी तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

१०) शाळा स्थलांतरास शासनाची पूर्वमान्यता आवश्यक आहे, ही बाब संस्थेच्या निदर्शनास आणून याबाबत यापुढे दक्षता घेण्याचे स्पष्ट करण्यात यावे.

३. सदरहू संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

स्वा.म.नानल

(स्वा.म.नानल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे.
प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८
अध्यक्ष / सचिव, श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, १, दामोदर भवन, ७/ए, ढोले पाटील रोड, पुणे- ४११ ००१

Scanned with OKEN Scanner

CITY

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर(श्रीश्रीरविशंकर)/पुवि/२०१५ १००८३/८८

दिनांक. 24 JUN 2015

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड

**विषय :- प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत ...**

श्री. श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट पणे संचलित श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर मोर्शी या शाळेचे चिंचवड पणे या कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या वडुसविले टाऊनशिप बो-हाडेवाडी मोशी येथे केलेल्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत

**संदर्भ :-** १)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र-माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२ दिनांक ३१ जुलै २०१३.

२) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १११४/प्र.क्र.१३०/एसएम-१/मंत्रालय मुंबई-३२ दि ०५.६.१४

३) प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र क्र ५४३/२०१४/ दि. १४.०७.२०१४

४)या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२/नोटीस/पुवि/२०१४/२१९३/९६ दि. ०३.०२.२०१५

५) प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र क्रशिक्षण /खाप्राशा/३/कावि/१०१/१५ दि.१०.२.१५

६)या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१४-१५/५४३०/३२ दि. १७.०३.२०१५

५)मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र प्राशास्थ ३२१५/प्र.क्र.११६/एसएम-१ मुंबई दि.२४.०४.१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर, मोशीं या शाळेचे चिंचवड पुणे या कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या वडुसविले टाऊनशिप बो-हाडेवाडी मोशीं येथे स्थलांतराचा प्रस्ताव संदर्भ क्र-६ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे.

श्री. श्री. रविशंकर विद्यामंदिर, ट्रस्ट पुणे संचलित श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर, मोर्शी या इंगजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेचे वडुसविले टाऊनशिप बो-हाडेवाडी , मोर्शी येथे शासन मान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात आले आहे. सदर संस्था विशेष मुलांच्या व गरीब शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे, तसेच स्थलांतरासाठी पालकांनी केलेली विनंती विचारात घेऊन या शाळेच्या स्थलांतरास खालील अटींच्या अधीन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

९. स्थलांतरीत प्राथमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.
१०. स्थलांतरास सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहिल.
११. शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमाचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.
१२. स्थलांतरीत ठिकाणी आरटीई अॅक्ट-२००९ नुसार प्राथमिक शाळेसाठी आवश्यक जागां, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शैक्षणिक व भौतिक सुविधांची पुर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील. याबाबत संस्थेच्या लेटरहेडवर शपथपत्र घेण्यात यावे. तसेच याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खात्री करुन घेणे आवश्यक राहील.
१३. श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर, मोर्शी या इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रीय अधिका-यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे तसे हमीपत्र संस्थेकडुन रु. १००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करुन घ्यावे.
१४. स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
१५. प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी अतिरिक्त शिक्षक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील.
१६. स्थलांतरीत शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजुरी देण्यात यावी.
१०. सदरहु स्थलांतरा संदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिका-याकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजुरी तात्काळ रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.
११. शाळा स्थलांतरास शासनाची पूर्व मान्यता आवश्यक आहे ही बाब संस्थेच्या निदर्शनास आणून याबाबत यापुढे दक्षता घेण्याचे स्पष्ट करण्यात यावे.

सदरहु संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास व या कार्यालयास कळविण्यात यावे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे-१
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- श्री. श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, संचलित श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर, मोर्शी पुणे



Scanned with OKEN Scanner